# मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांसाठी विशेष केंद्राद्वारे मार्गदर्शन व समुपदेशनासाठी विशेष सोय

पुणे :- सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सर्वंकष आधार पुरविण्याच्या उद्देशाने मुकुल माधव फाऊंडेशन साताऱ्यातील रुबी हॉल हेल्थ केअर सर्व्हिसेस येथे विशेष सल्लाकेंद्र उघडणार आहे. येथे या मुलांना दूर-पुनर्वसन कार्यक्रमाचे लाभ घेता येतील तसेच केईएम रुग्णालय, पुणे येथील तज्ज्ञांचे मार्गदर्शन व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे मिळविता येईल. बालमेंदू तज्ज्ञ आणि मानसशास्त्रज्ञांसारख्या तज्ज्ञांची उणीव पूर्ण करण्यास यामुळे मदत होईल, अशी घोषणा मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्र्वस्त रितू छाब्रिया यांनी शुक्रवारी केली. ही जागा मोफत उपलब्ध करून देणारे रुबी हॉलचे डॉ. परवेज ग्रँट आणि या उपक्रमात सहकार्य करणारे डॉ. भारती पाटील यांनी प्रतिनिधित्व केलेल्या केईएम रुग्णालयाचे डॉ. आनंद पंडित यांचे एमएमएफ आभार मानू इच्छिते.